23-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/22/2025 10:44 PM Page 1



महिलांच्या राजकीय आरक्षणासाठी काँग्रेस छेडणार आंदोलन » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



केसरबाई केरकर विद्यालयाच्या संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन » पान ४ वर

वेर्णा, रविवार, २३ मार्च २०२५ । पाने ४ । ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 200 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 23 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### एटीएम ट्रान्झॅक्शन शुल्कात बदल होणार

नवी दिल्ली, दि. २२ : भारतीय रिझर्व्ह बँके येत्या १ एप्रिलपासून बँकिंग नियमात बदल करणार आहे. बँकिंग सिस्टमला आणखी सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी तसेच ग्राहकांना सर्व व्यवहार सोयीचा जावा यासाठी हे नियम बदलणार आहे. हे नियम एसबीआय, पीएनबी, कॅनरा बँक आणि एचडीएफसी बँकेसह अनेक बँकांना लागू होणार आहेत. सर्वात आधी बँक खात्यात मिनिमम बॅलन्स ठेवणे गरजेचे होणार आहे. तसेच बचत खाते असलेल्या बँकधारकांना आता आधीच्या तुलनेत जास्त रक्कम आपल्या खात्यात ठेवावी लागेल. जर ही रक्कम ठेवली नाही तर दंड बसू शकतो. एटीएम ट्रान्झॅक्शन शुल्कात बदल केला जाणार आहे. सध्या दिली जाणारी फ्री एटीएम ट्रान्झंक्शनच्या संख्येत कपात केली जाण्याची शक्यता आहे. दुसऱ्या बँकेच्या एटीएममधून व्यवहार केल्यास अतिरिक्त शुल्क द्यावे लागू शकते. सध्या ३ ते ५ वेळा फ्री पैसे काढता येतात. नव्या नियमात अतिरिक्त प्रति ट्रान्सॅक्शनवर २० ते २५ रुपये चार्ज लागू शकतो. याशिवाय, बँकांनी बचत खाते आणि फिक्स्ड डिपॉझिट (एफडी) च्या व्याजदरात बदल केले आहेत.

---

### नामिबियाला मिळाली महिला राष्ट्राध्यक्ष

नामिबिया, दि. २२ : आफ्रिका खंडातील नामिबिया देशाला आज पहिली महिला राष्ट्राध्यक्ष मिळाली. नेतुम्बो नंदी-नदैतवाह असे त्यांचे नाव आहे. त्यांनी गेल्या वर्षी निवडणूक जिंकली होती. त्यांच्या शपथविधीला अंगोला आणि दक्षिण आफ्रिकेसह शेजारी राष्ट्रांचे प्रमुख सहभागी झाले. ७२ वर्षीय नेतुम्बो नंदी-नदैतवाह यांनी नोव्हेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत ५८ टक्के मते मिळाली होती. एनएनएन' या नावाने त्या ओळखल्या जातात. त्या साऊथ वेस्ट आफ्रिका पीपल्स ऑर्गनायझेशन या पक्षाच्या आहेत. त्यांनी १९९० मध्ये पहिल्यांदा खासदार म्हणून संसदेत प्रवेश केला होता. नामिबियात महिला आणि बाल कल्याण विभाग त्यांनी सांभाळला आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांनी उपराष्ट्रपती म्हणून कार्यभार सांभाळला आहे.

---

### सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश मणिपूरला

इन्फाळ, दि. २२ : सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांचा समावेश असलेले एक शिष्टमंडळ – न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती एमएम सुंदरेश, न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन आणि न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंह शनिवारी मणिपूरला पोहचले. शिष्टमंडळाने चुराचंदपूर येथे मणिपूरमधील वांशिक हिंसाचाराच्या निर्वासितांची भेट घेतली. तसेच मदत छावण्यांना भेट दिली. यानंतर शिष्टमंडळ बिष्णुपूरमधील मोईरांग कॉलेजमध्ये पोहोचले. न्यायमूर्ती गवई यांनी चुराचंदपूरमध्ये २९५ कायदेशीर सेवा शिबिरे, आरोग्य शिबिरे आणि कायदेशीर मदत क्लिनिकचे उद्घाटन केले. ते म्हणाले- आपल्या संविधानाचे उद्दिष्ट सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रदान करणे आहे. त्याच वेळी, न्यायमूर्ती कोटिश्वर सिंह म्हणाले- मला विश्वास आहे की एक दिवस मणिपूरची भरभराट होईल. आपल्याला आपल्या संविधानावर विश्वास असला पाहिजे. एक दिवस मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित होईल आणि ती यशस्वी होईल. येथे मदत देण्यासाठी आपण एकत्र काम केले पाहिजे.
देशातील सर्व नागरिकांना जलद आणि स्वस्त न्याय (किमान किमतीत) उपलब्ध करून दिला पाहिजे, असे न्यायमूर्तींनी सांगितले.

### हवामान

कमाल : ३५किमान : २४
आर्द्रता : ६१

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,४५० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०१,००० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७६,९०५ .७७↑ (३१.१६)
निफ्टी : २३,३५०.९० ↑ (८३.९५)

# 'सेव्ह ओल्ड गोवा' संघटनेचा निषेध मोर्चा!

## हेरिटेज परिसरात प्रस्तावित शॉपिंग मॉलच्या विरोधात मोर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २२ : ओल्ड गोवा हेरिटेज परिसरात प्रस्तावित शॉपिंग मॉलच्या विरोधात सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीने एल्गार पुकारला असून पर्यटन विभागाच्या विरोधात उद्या ( रविवारी ) मोठ्या संख्येने मोर्चा काढण्यात येणार आहे. हा प्रकल्प ऐतिहासिक वारसा स्थळाचा विध्वंस करणार असल्याचा आरोप सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीकडून करण्यात येत आहे.**




दरम्यान, पर्यटन विभागाने स्पष्टीकरण देत सांगितले आहे की, हे बांधकाम प्रसाद योजनेअंतर्गत बॉम जीसस बॅसिलिका आणि पर्यटन सुविधांच्या विकासासाठी आहे. त्यासाठी सर्व आवश्यक परवानग्या घेतल्याचे विभागाने फलकाद्वारे स्पष्ट केले आहे.

सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीचे समन्वयक पीटर व्हिएगस यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले की, पर्यटन विभागाने मोठ्या प्रमाणावर झाडे तोडून बफर झोनमध्ये मेगा शॉपिंग मॉल उभारण्याची योजना आखली आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना यासंदर्भात सुमारे ३५ हजार लोकांच्या स्वाक्षऱ्यांसह याचिका देण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने हा प्रकल्प थांबवण्याऐवजी हेरिटेज साइटचा विद्ध्वंस सुरू केला आहे. त्या पार्श्वभूमीवर, रविवारी दुपारी ४ वाजता बॉम जीसस बॅसिलिकासमोर निषेध मोर्चा काढण्यात येणार असल्याचे व्हिएगस यांनी जाहीर केले. त्यांनी युनेस्कोच्या मान्यतेसह संरक्षित या ऐतिहासिक वारसा स्थळाच्या रक्षणासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

संघटनेच्या सदस्य जॅकलिन फर्नांडिस यांनी सांगितले की, भारत सरकारच्या प्रसाद योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल करण्यात आली आहे. हे हेरिटेज स्थळ उद्ध्वस्त करण्याचे षड्यंत्र आहे. आपली संस्कृती आणि वारसा पुढील पिढ्यांसाठी टिकवून ठेवण्यासाठी हा लढा आवश्यक आहे.





# 'ओस्सय... ओस्सय...'चा नाद राजधानीत दुमदुमला

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** 'ओस्सय...ओस्सय', 'घुमचे कटर घूम' चा नाद शनिवारी राजधानी पणजीत दुमदुमला. पणजी शिमगोत्सव समिती, वाहतूक विभाग, पणजी महानगरपालिका यांच्या सहयोगाने आयोजित शिमगोत्सवात आकर्षक चित्ररथ, रोमटामेळ, लोकनृत्य तसेच विविध वेशभूषा उपस्थित लोकांचे आकर्षक ठरले. शिमगोत्सवाच्या मिरवणुकीतून गोमंतकीय लोकसंस्कृती, लोककला आणि लोकपरंपरेचे दर्शन घडविले. यावेळी रोमटामेळ पथकांचे नृत्य, विविध कलाकारांची वेशभूषा आणि आकर्षक चित्ररथ पाहण्यासाठी लोकांनी मोठया प्रमाणात गर्दी केली होती.

मिरवणुकीला दिवजा सर्कल येथील मांडवी पुलाखालून सांता मोनिका जेटी येथून (जुने सचिवालय) सुरुवात झाली. मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीत बदल करण्यात आला होता. तर जोझ फालकांव रस्ता, जुआंव क्रास्टो रस्ता, मॅच कार्नर ते कासा इंटरनॅशनल (एम.जी. रोड), काकुलो बेट ते सांतिनेझ जंक्शन तसेच चर्च चौक ते कोर्तीन फूट ब्रिज येथील रस्ता नो पार्किंग' झोन म्हणून जाहीर केला होता.

# बिहारींनी गोव्याची संस्कृती जपावी : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** देशाला अनेक अधिकारी देणाऱ्या बिहारमधील काही व्यक्ती जेव्हा गोव्यात गुन्हेगारी प्रकरणांत अडकतात, तेव्हा आम्हालाही दुःख होते, असे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी नमूद केले. गोव्याने नेहमीच सर्वांचे स्वागत केले असून, येथे राहणाऱ्या बिहारवासीयांनी शांततापूर्ण राहावे आणि गोव्याच्या संस्कृतीचा सन्मान राखावा, असे आवाहन त्यांनी केले. ते पणजी येथील इन्स्टिटयूट मिनेझिस बागांझा सभागृहात 'बिहार दिन' निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, प्रदेशाध्यक्ष दामू नाईक, राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री सावंत म्हणाले की , बिहार हे बुद्धिमत्तेच्या बाबतीत अग्रगण्य आहे. चाणक्यांचा वारसा लाभलेल्या या राज्याशी गोव्याचे दृढ नाते आहे. गोव्यात बिहारी समाज आनंदाने राहावा, पण काही व्यक्तींच्या गुन्हेगारी सहभागामुळे बिहारचे आणि परिणामी गोव्याचे नाव बदनाम होऊ नये. बिहारमधील नागरिकांना गोव्यात गुन्हेगारीच्या प्रकरणांमध्ये अडकलेले पाहून आम्हालाही तितकेच दुःख होते, जेवढे बिहारवासीयांना होते असे मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी गोवा स्वातंत्र्यलढ्यात बिहारच्या योगदानाचा उल्लेख केला. यापूर्वी बिहारच्या नागरिकांना बिहारी' म्हणून ओळखले जात असे, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली त्यांना बिहारवासी' अशी ओळख मिळाल्याचे त्यांनी सांगितले. बिहारच्या प्रगतीसाठी डबल इंजिन सरकार' आवश्यक असून, ते तेथे कायम राहावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी गोवा आणि बिहार यांचे संबंध अधिक दृढ होत असल्याचे सांगितले. या संबंधांना आणखी बळकटी देण्यासाठी दोन्ही राज्यांतील नागरिकांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचवले. तसेच गोवा-बिहार विशेष रेल्वेगाडीच्या मागणीबाबत पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री सावंत पुढे म्हणाले, गोवा सर्वधर्म समभावाने राहणारे राज्य आहे. आम्हाला बिहारमधील गुन्हेगारांची येथे आवश्यकता नाही. बिहारमधील काही व्यक्तींमुळे संपूर्ण बिहारचे नाव खराब होता कामा नये. गोव्यातील सर्व बिहारी नागरिकांनी डबल इंजिन सरकार'ला सहकार्य करावे आणि गोमंतकीयांसारखे गुण्यागोविंदाने राहावे. दरवर्षी २२ मार्च हा दिवस 'बिहार दिन' म्हणून साजरा केला जातो. बिहारच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात मुख्यमंत्री सावंत यांनी बिहारवासीयांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी सर्व बिहारी नागरिकांना गोव्याची संस्कृती जपण्याचे आणि सामाजिक सौहार्द टिकवण्याचे आवाहन केले.

# भाडेपट्टा हक्कांचा प्रश्न मार्गी लावा

## लोटलीतील शेतकऱ्यांची मागणी | १५० जणांना बसतोय फटका

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२ :** येत्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या गोवा विधानसभा अधिवेशनात लोटलीमधील शेतकरी भाडेपट्टा हक्कांवरील तोडगा निघावा यासाठी प्रयत्नशील आहेत. कार्बोट, मस्कासाना आणि बेब्दो भाडेपट्टा असोसिएशनचे प्रतिनिधित्व करणारे शेतकरी खाजन जमिनीवरील आपले कायदेशीर हक्क मिळवण्यासाठी गेल्या अनेक दशकांपासून संघर्ष करत आहेत. या प्रश्नामुळे सुमारे ६.५० लाख चौरस मीटर क्षेत्रावर शेती करणाऱ्या १५० शेतकऱ्यांना फटका बसला आहे.

या प्रश्नाचे मूळ भाडेपट्टाधारकांशी संबंधित आहे, ज्यांपैकी अनेक जण निरक्षर होते आणि त्यांनी आवश्यक दस्तऐवज, जसे की भाडेपट्टा कागदपत्रे किंवा फोरो पावत्या, जपल्या नव्हत्या. परिणामी, त्यांचे वारस आपल्या हक्कांची नोंदणी करू शकत नाहीत. लोटली कोमुनिदाद कडून फक्त फॉर्म १ आणि १४ मधील नोंदींवर आधारित प्रमाणपत्रे दिली जात असल्याने ही प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची झाली आहे. १९७० च्या दशकात तयार झालेल्या या दस्तऐवजांमध्ये मूळ भाडेकरूंची नावे असली तरी सध्याच्या व्यवस्थापकीय समितीला त्यांच्या वारसांचे हक्क मान्य करण्यास अडचणी येत आहेत.

या मुद्द्यावर आवाज उठवण्यासाठी लोटलीमधील शेतकऱ्यांचे एक शिष्टमंडळ मये येथे जाऊन आमदार प्रेमेंद्र शेट यांना भेटले. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांचाही यात समावेश होता. शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रिया सुलभ करून त्यांचे हक्क कायदेशीररीत्या मान्य करावेत, अशी मागणी केली. ९५ वर्षीय डोमिंगो कोस्टा यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी आपली व्यथा मांडली.

आमदार प्रेमेंद्र शेट यांनी हा मुद्दा विधानसभेत मांडण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांनी महसूल मंत्र्यांना संबोधित करत प्रश्न विचारला आहे की, सरकार कायदेशीर वारसांना भाडेपट्टाधारक म्हणून नोंदणी करण्यासाठी कोणते धोरण अवलंबणार आहे ? तसेच, ही प्रक्रिया किती कालमर्यादेत पूर्ण होईल आणि ती सुलभ करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातील, याबाबतही त्यांनी सरकारकडे स्पष्टीकरण मागितले आहे.

भाडेकरू संघटनेचे अध्यक्ष अल्बर्ट पिन्हेरो यांनी सरकारच्या भूमिकेबाबत आशावाद व्यक्त करताना सांगितले, सरकारने प्रक्रिया स्पष्ट करून शेतकऱ्यांचे हक्क सुनिश्चित करावेत. त्यांनी या समस्येमुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींवरही प्रकाश टाकला.

शेतकऱ्यांच्या तक्रारी केवळ कायदेशीर हक्कांपुरत्याच मर्यादित नाहीत, तर कृषी कार्ड आणि इतर सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यावरही परिणाम होत आहे. भाडेपट्टा हक्कांशिवाय शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे, विधानसभा अधिवेशनात यावर ठोस तोडगा निघेल आणि नोंदणी प्रक्रिया सुकर होईल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.सोमवारपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनात या विषयावर सकारात्मक चर्चा होईल आणि दशकांपासून सुरू असलेल्या संघर्षाला न्याय मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# तिरंदाजीच्या प्राचीन परंपरेला गोव्यात मिळतोय नवा आयाम

## 'झिटो ' देतायत ३०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण | सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष

अजित जॉन / टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** गोव्यात तिरंदाजीला पुनरुज्जीवित करण्याचे ध्येय बाळगून जोस लुईस गुदिन्हो , ज्यांना सर्वजण झिटो म्हणून ओळखतात, आपले जीवन समर्पित करत आहेत. अपंगत्व आलेले असूनही त्यांनी हा क्रीडा प्रकार तरुणांमध्ये रुजवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. मात्र, हा प्रवास नेहमीच सोपा नव्हता, अनेक अडथळे आणि निराशाजनक प्रसंगांचा सामना त्यांनी केला आहे.

एकेकाळी गोलरक्षक राहिलेल्या जोस गुदिन्हो यांना चालण्यात काही अडचणी असल्या, तरीही त्यांनी गोव्यातील पिलार येथे तिरंदाजीच्या प्रशिक्षणासाठी स्वतःला झोकून दिले आहे. त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात १९८० च्या दशकात झाली. पोलिस संघासाठी त्यांनी गोलरक्षक म्हणून कामगिरी केली आणि राज्य संघात स्थान मिळवणारे ते सर्वात तरुण खेळाडू ठरले. मात्र, आर्थिक स्थैर्यासाठी त्यांनी १९८६ मध्ये दुबई गाठले.

दुबईतील एका नामांकित हॉटेलमध्ये



मनोरंजन व्यवस्थापक म्हणून कार्यरत असताना त्यांना तिरंदाजीच्या क्षेत्रात प्रवेश करण्याची संधी मिळाली. प्रारंभी त्यांनी मातीच्या कबुतरांच्या शूटिंगचे प्रशिक्षण दिले. त्यांना पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान बेनझीर भुट्टो आणि फ्रेंच फुटबॉलपटू एरिक कॅन्टोना यांना प्रशिक्षित करण्याचा मान मिळाला. मात्र, तिरंदाजी हा त्यांचा निव्वळ योगायोगाने आलेला अनुभव होता.

२०१६ मध्ये जोस गुदिन्हो गोव्यात परतले. निवृत्तीच्या शांत आयुष्याऐवजी त्यांनी तिरंदाजीच्या विकासासाठी आपली ऊर्जा समर्पित करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी डॉन बॉस्को मध्ये तिरंदाजी क्लब सुरू केला, जिथे त्यांनी युवा खेळाडूंना मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रशिक्षणामुळे गोव्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवले.

झिटो यांना तिरंदाजीला चालना देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा मिळण्यात अडचणी आल्या. योग्य मैदानाच्या अभावामुळे प्रशिक्षण वेळ मर्यादित राहतो. त्यांनी क्रीडामंत्र्यांकडे पाठपुरावा केला, मात्र ठोस मदत मिळू शकली नाही. त्यांनी स्थापन केलेल्या झिटो आर्चरी क्लब अंतर्गत सध्या आठवड्यातून तीन वेळा प्रशिक्षण घेतले जाते, तसेच विविध शाळांमध्ये तिरंदाजीचे धडे दिले जातात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३०० ते ४०० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. झिटो यांच्या मते, गोव्यात तिरंदाजीसाठी प्रतिभावान खेळाडू आहेत, मात्र त्यांच्यात सातत्य आणि समर्पणाचा अभाव आहे. भारतातील आघाडीच्या तिरंदाजांसारखे येथे खेळाडू दिवसाला ८ तास प्रशिक्षण घेत नाहीत. तसेच, आर्थिक अडचणीही मोठा अडथळा ठरत आहेत.

तिरंदाजीसाठी वापरली जाणारी रिकर्व्ह धनुष्ये १५ हजार ते २० हजार रुपयांच्या दरम्यान असतात, जी स्वतःच्या खिशातून खरेदी करणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान आहे. तरीही, त्यांच्या प्रशिक्षार्थींपैकी काही जण राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेत उतरले आहेत आणि भविष्यात पदक मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

तिरंदाजीसाठी अधिक मदत मिळावी, यासाठी झिटो यांचे सरकारकडे अपेक्षेपूर्ण नजरेने पाहणे स्वाभाविक आहे. खेळासाठी आवश्यक त्या सुविधा आणि आर्थिक मदत मिळाल्यास, गोवा भविष्यात तिरंदाजीतील राष्ट्रीय स्तरावरील यश संपादन करू शकेल, असे त्यांचे मत आहे. प्रतिभा आहे, पण ती जोपासण्यासाठी प्रेम आणि समर्पण हवे. जर योग्य पाठिंबा मिळाला, तर गोव्याचे खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकतील,असे झिटो सांगतात.

आपल्या कारकिर्दीच्या अंतिम टप्प्यावर असतानाही झिटो यांनी आपले ध्येय सोडलेले नाही. त्यांचे स्वप्न आहे की, गोव्यातून राष्ट्रीय स्तरावरील तिरंदाज घडावेत आणि हा प्राचीन क्रीडा प्रकार नव्या उंचीवर पोहोचावा. त्यांच्या अथक प्रयत्नांना आणि जिद्दीला योग्य दिशा मिळाली, तर गोवा तिरंदाजीच्या नकाशावर ठळकपणे उमटेल, यात शंका नाही.